

गणपती
बाप्पा
मोरया...


www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-४९ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. २५ ऑगस्ट २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४


## छत्रपती संभाजीनगर शहर पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून शाश्वत पाणीपुरवठा - मुख्यमंत्री फडणवीस

### फारोळा येथे २६ द.ल.ली. जलशुद्धीकरण केंद्राचे जलपूजन

**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर शहर पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून पुढील २५-३० वर्षे शहराच्या अपेक्षित लोकसंख्येला शुद्ध व सातत्यपूर्ण पाणीपुरवठा देता येईल अशी योजना पूर्णत्वाकडे जात आहे. २६ द.ल.ली. हा या योजनेतील एक टप्पा आहे. उर्वरित कामेही वेळेत पूर्ण करून शहराला ३६५ दिवस २४द७ शाश्वत पाणीपुरवठा करता होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला.

फारोळा येथे २६ द.ल.ली. क्षमता असलेल्या जलशुद्धीकरण केंद्राचे जलपूजन मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री आणि संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण आणि दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, खासदार संदिपान भुमरे, खासदार डॉ.कल्याण काळे, खासदार डॉ.भागवत कराड, आमदार नारायण कुचे, आमदार प्रदीप जयस्वाल, आमदार अनुराधा चव्हाण, आमदार संजय केणेकर, आमदार सतीश चव्हाण, माजी महापौर नंदकुमार घोडेले, किशोर शितोळे, राजेंद्र जंजाळ, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, महानगर पालिका आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, छत्रपती संभाजीनगर शहरासाठी २०१९ मध्ये सुरू झालेल्या या पाणीपुरवठा योजनेला सुरूवातीला १८०० कोटींची मंजुरी मिळाली, महानगरपालिकेचा आर्थिक हिस्सा शासनाने उचलण्याचा निर्णय घेऊन या योजनेला गती दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नव्याने सुरू केलेल्या अटल अमृत योजनेत या योजनेचा समावेश करण्यात आला. केंद्र शासनाच्या अटल अमृत योजनेतून हजारो कोटी रूपये महाराष्ट्राला दिले. ५६ एमएलडीच्या जुन्या योजनांचे पूर्नजीवन करण्यासाठी ही योजना महत्वपूर्ण ठरली. याच योजनेत छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेचा समावेश करण्यात आला असुन २७०० कोटी रूपये एकूण खर्च असलेली ही योजना जलदगतीने सुरू आहे. २०२३ मध्ये १८ टक्के वरुन २०२५ मध्ये या योजनेची प्रगती ८२ टक्क्यांपर्यत पोहोचली आहे. वॉर रूम प्रोजेक्टच्या माध्यमातून योजनेतील अडचणी दूर करून योजनेला गती देण्यात येत असल्याचेही ते म्हणाले. शहर पाणीपुरवठा योजनेतील अडथळे बाजूला करून योजना पूर्णत्वाकडे नेत असल्याचा उल्लेख करताना महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासह संबंधित यंत्रणांचे अभिनंदन करून मुख्यमंत्री म्हणाले, वॉर रुममध्ये झालेल्या आढावा बैठकीत ही योजना जलदगतीने पुढे सरकत असल्याचे दिसून आले. सध्या केवळ काही किरकोळ कामे बाकी आहेत. ५६ ईएसआर तयार करण्याचे उद्दिष्ट असून त्यापैकी मोठा भाग पूर्ण झाला आहे. उर्वरित कामेही वेळेत पूर्ण करून पुढील २५-३० वर्षे शहराला ३६५ दिवस २४द७ शाश्वत पाणीपुरवठा देता येईल. महानगरपालिकेचा ८०० कोटी रूपयांचा हिस्सा शासनाने हुडकोमार्फत उपलब्ध करून दिला आहे. पुढील महिन्यात याबाबतची आवश्यक प्रक्रिया पूर्ण होऊन हा निधी मिळणार आहे. उर्वरित निधीचीही शासनाने तरतूद केली असून निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. येत्या डिसेंबरपर्यंत योजना पूर्ण करा असे निर्देशही त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

छत्रपती संभाजीनगर हे राज्यातील एक महत्वाचे शहर असून मॅन्युफॅक्चरिंग हब बनत असून औद्योगिक संधी वाढत आहेत. त्याला अनुरूप अशा पायाभूत सुविधा देणे गरजेचे आहे. याच उद्देशाने पाणी पुरवठा योजनेतील उर्वरित कामे जलद गतीने पूर्ण केली जातील. शहरातील अतिक्रमण निर्मूलन मोहिमेत प्रशासन व लोकप्रतिनिधींनी मिळून चांगले काम केले आहे. अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक निधी शासन उपलब्ध करून देईल. शहराच्या विकासासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी एकत्र येऊन निर्णय घेतात ही बाब महत्वाची आहे. शहराच्या सर्वांगिण विकासासाठी निधीची कमतरता पडु देणार नाही, असेही ते म्हणाले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे यांनी प्रास्ताविक केले. छत्रपती संभाजीनगर शहरास १०० द.ल.लि. आणि ५६ द.ल.लि. क्षमतेच्या दोन पाणी पुरवठा योजना सध्या कार्यान्वित आहेत. त्यातून १२०० मि.मी. लोखंडी, ७०० मी.मी. पाईपलाईन व्दारे १२० द.ल.ली व ९०० मि.मी. व्यासाच्या डीआय पाईप लाईन व्दारे २५ द.ल.ली असा एकुण १४५ द.ल.ली एवढा पाणी पुरवठा होत आहे. सद्यास्थितीत २६ द.ल.ली जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वीत करण्यात येत असल्यामुळे पाणी पुरवठ्यात २६ द.ल.ली एवढी वाढ होऊन एकुण १७१ द.ल.ली एवढा पाणीपुरवठा होणार असुन शहरातील नागरिकांना यामुळे दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

२६ द.ल.ली जलशुद्धीकरण केद्रांचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते बटण दाबुन उद्घाटन करण्यात आले. यावेळी जलपूजनही करण्यात आले.

## डॉ. जिवन राजपूत राष्ट्रीय राजपूत करणी सेना या संघटनेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी निवड

**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

समाजाचे सन्मानीय मार्गदर्शक, समाजसेवक, जनसेवक, आरोग्यसेवक, वकील, उद्योजक, सुप्रसिद्ध न्युरो सर्जन आणि जे जे प्लस हॉस्पीटल छत्रपती संभाजीनगर चे संचालक, वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय, प्रशंसनीय कामगिरी असे सर्वांचेच आवडते डॉ. जिवन राजपूत साहेब यांची राष्ट्रीय राजपूत करणी सेना या संघटनेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे मनापासून खूप खूप हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

छत्रपती संभाजीनगरातील प्रतिष्ठीत नागरिक म्हणून डॉ. जीवन राजपूत यांचे नाव घेतले जाते. सदैव समाजसेवेत अग्रेसर तसेच दांडगा जनसंपर्क त्यांचा आहे. डॉक्टरकीच्या व्यवसायातून समाजाची सेवा ते सदैव करत असतात. अनेक रूग्ण बरे झाल्यावर देखील फक्त भेटण्यासाठी छत्रपती संभाजीनगरात येतात. काहीही अडचण असल्यास त्याचे पूर्ण निराकरण ते करत असतात. नुकतीच त्यांची आरोग्य तपासणीच्या माध्यमातून हजारो रूग्णांचा उपचार व औषधी मोफत देण्याचे शिबीर संपन्न केले होते.






## जिल्ह्यात डीजेमुक्त गणेशउत्सव साजरा करावा - पालकमंत्री संजय शिरसाट

**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

गणेशोत्सव हा यावर्षी राज्य महोत्सव म्हणून साजरा करत आहोत. या महोत्सवाची तयारी पोलीस प्रशासन व जिल्हा प्रशासनाने उत्तम पद्धतीने केली आहे, यामध्ये गणेश मंडळांनी देखील पुढाकार घेऊन शांततेत आणि उत्साहाच्या वातावरणात डीजे ऐवजी पारंपारिक वाद्याचा वापर करत डीजे मुक्त गणेश उत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांनी आज गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समन्वय समितीच्या बैठकीत केले.एमआयटी महाविद्यालयाच्या मंथन सभागृहात या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.




या बैठकीस विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जालना मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे, राज्यसभेचे खासदार डॉ.भागवत कराड आमदार प्रदीप जयस्वाल महानगरपालिका आयुक्त जी .श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी ,पोलीस आयुक्त प्रवीण पवार, गणेश मंडळाचे अध्यक्ष पृथ्वीराज पवार, यांच्यासह विविध गणेश मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

शिरसाट म्हणाले की, प्रशासनाने विविध समस्या सोडवून गणेशोत्सवाची तयारी केली आहे ही आनंदाची बाब असून गणेश उत्सव पाहण्यासाठी येणाऱ्या कुटुंबातील सर्व नागरिकांना गणेशोत्सवाचा आनंद घेता यावा यासाठी गणेश मंडळाने डीजे मुक्त उत्सव साजरा करावा . डीजे ऐवजी पारंपारिक वाद्य, ढोलताशे व इतर वाद्याचा वापर करून उत्साहाचे वातावरण ठेवावे. त्याचबरोबर पोलीस प्रशासनाने अमलीपदार्थची विक्रीस प्रतिबंध तसेच यावरील कारवाई करण्याचे निर्देश यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांनी पोलीस प्रशासनाला दिले.

छत्रपती संभाजीनगर हे विकासाच्या वाटेवर वेगाने वाटचाल करत असून यासाठी सर्व पक्ष, सर्व पदाधिकारी, नागरिक यांनी उत्सवाच्या माध्यमातून जिल्ह्याची शांतता व प्रगतीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी उपस्थित गणेश मंडळ पदाधिकारी व नागरिकांना त्यांना केले.

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी महापालिकेने गणेश विसर्जनाची तयारी कृत्रिम तलावाच्या माध्यमातून वेगवेगळ्या ठिकाणी करावी .यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याबाबतही पोलीस प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. खासदार कल्याण काळे यांनी लेझर लाईटचा वापर गणेशोत्सवा दरम्यान करू नये, त्याचप्रमाणे अमली पदार्थांचे विक्री प्रतिबंध तसेच यामध्ये स्थानिक पोलीस प्रशासनाने वेळीच कारवाई करण्याचेही आवाहन यावेळी केले. खासदार डॉ. भागवत कराड यांनी गणेश मंडळांनी अवयदान त्याचप्रमाणे आरोग्य शिबिर यासारख्या विविध समाज उपयोगी उपक्रमाची अंमलबजावणी करून वेगळ्या पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याबाबतही आवाहन केले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, गणेश उत्सव हा एकतेचा उत्सव असून या उत्सवाच्या माध्यमातून पर्यावरणाचे रक्षण करणारे संदेशाचे देखावे व इतर नाविन्यपूर्ण देखावे गणेश मंडळांनी करावे. व राज्य शासनाच्या होणाऱ्या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन नामांकन पाठवावे. वृक्षारोपण सारख्या मोहिमेत सहभाग घेऊन प्रत्येक गणेश मंडळांनी पुढाकार घेण्याचे ही यावेळी जिल्हा प्रशासनाच्या मार्फत करण्यात आले. महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या काही परवानग्या या मोफत दिल्या जाणार असून,.ज्या ठिकाणी परवानगी घेतली आहे त्यांनी फक्त यावेळी संबंधित गणेश मंडळाने माहिती देणे आवश्यक आहे. रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम सुरू आहे. महापालिका गणेश उत्सव दरम्यान पाणी, रुग्णवाहिका, रुग्णालयातील उपचार, शहरातील मुख्य ठिकाणी विद्युत रोषनाई विसर्जनाच्या वेळी निर्माल्याचे संकलन करण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे .फिरते शौचालय, वेगवेगळ्या ठिकाणी मूर्ती दान व गणेश मूर्तीचे विसर्जन यासाठी कृत्रिम तलावाची व्यवस्था महापालिकेच्या मार्फत करण्यात आले असल्याचे सांगितले. गणेश उत्सव हा नागरिकांना आनंददायी व्हावा यासाठी महापालिका प्रयत्न करत असून अडचणी असेल तर नागरिकांनी महापालिकेच्या संपर्क कक्षाच्या माध्यमातून मदतही देण्याचे आश्वासन जी. श्रीकांत यांनी दिले. पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून डीजेमुक्त आणि लेझरचा लाईट वापर न करता गणेश उत्सव साजरा करावा. तसेच समाज माध्यमातून विविध चुकीच्या पोस्ट किंवा माहिती प्रसारित करू नये, जेणेकरून शहर आणि जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था अबाधित राहील यासाठी गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनीही एकोपा जपण्यासाठी काम करावे असे आवाहन पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी केले. या समन्वय आढावा बैठकीमध्ये विविध गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिकेच्या अंतर्गत असणाऱ्या वीज वितरण करणाऱ्या तारांचे योग्य व्यवस्थापन ,तसेच रस्त्यावरील खड्डे बुजवण्याबरोबरच. अमली पदार्थाची विक्री व सेवन करणाऱ्यावर प्रतिबंधात्मक कारवाईबाबत ही सूचना पोलीस प्रशासन व जिल्हा प्रशासनास केल्या. सर्व विभागाने योग्य ती कारवाई करून शांततेत, समन्वयाने गणेश उत्सव साजरा करण्याची ग्वाही जिल्हा प्रशासनामार्फत देण्यात आली.

## संपादकीय

# गणपती ज्ञान, बुद्धीसह शौर्याची देवता

श्रीगणेश हे हिंदूंचे आद्यदैवत असून सर्व कार्याच्या आरंभी त्याचे पूजन केले जाते. गणपती ही ज्ञान आणि बुद्धीची देवता आहेच, त्याचबरोबर ती शौर्याचीदेखील देवता आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे इतर कुठल्याही देवतेची पूजा, आराधना गणपतीने केली, असे कुठल्याही पुराणात संदर्भ आढळत नाहीत. म्हणून गणपती ही देवता सार्वभौम म्हणून वर्णन केली जाते. गणपतीचे विविध अवतार सांगितले जातात.

सर्व देवतांनी, थोर संतांनी आणि अनेक गणेशभक्तांनी गणेशस्तवन करून अखंड शांती मिळिवली. मात्र गणपतीने कधी कोणा देवतेची स्तुती केली अथवा कोणा देवतेची स्थापना केली किंवा वर्षानुवर्षे तपश्चर्या केली असे वेद-पुराणात कोठेही वर्णन नाही, मात्र गणपतीचे विविध अवतार सांगितले जातात, ते अवतार कोणते ते जाणून घेऊया.

गणेश पुराणात गणपतीचे चार अवतार अनुक्रमे सत्य, त्रेता, द्वापर आणि कलियुगात झाले असा उल्लेख आहे. यामध्ये 'विनायक' हा दशभुजाधारी आणि रक्तवर्णी असा गणपतीचा अवतार असून त्याचे वाहन सिंह आहे. कश्यप आणि अदिती यांच्या पोटी त्याने जन्म घेतला. त्यामुळे काश्यपेय नावाने तो प्रसिद्ध झाला. या अवतारात नरान्तक आणि देवान्तक नावाच्या दोन असुर भावांचा आणि धूम्राक्ष नावाच्या दैत्याचा वध केला.

'मयुरेश्वर' हा सहा भुजांचा आणि श्वेतवर्णी अवतार आहे. याचे वाहन मोर आहे. त्रेतायुगात शिवपार्वतींचा पुत्र म्हणून हा जन्मला आला. या अवतारात सिंधू नावाच्या दैत्याचा त्याने वध केला. आपले वाहन मोर त्याने कार्तिकेला दान केले. मोरगाव येथे मोरेश्वराचे मंदिर आहे.

'गजानन' हा चतुर्भुज आणि रक्तवर्णी अवतार असून त्याचे वाहन उंदिर आहे. द्वापार युगात शिवपार्वतींचा पुत्र म्हणून त्याचा जन्म झाला. या अवतारात त्याने सिंदूर नावाच्या दैत्याच्या वध केला.

'धूम्रकेतु' हा द्विभूज अथवा चतुर्भूज अवतार आहे. त्याला धूम्रवर्णी अवतार असेही म्हणतात. याचे वाहन निळा घोडा आहे. हा अवतार कलियुगाच्या शेवटी अवतीर्ण होईल आणि अनेक दैत्यांचा नाश करेल असे सांगितले जाते. मुद्गल पुराणात गणपतीच्या आठ अवतारांचे वर्णन सापडते. दुर्गुणांवरील विजय असा त्याचा भावार्थ आहे. त्या आठ अवतारांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

'वक्रतुण्ड' हा मुद्गल पुराणातील गणपतीचा प्रथम अवतार आहे. याचे वाहन सिंह असून या अवतारात मात्सर्यासुराचा (अर्थात मत्सराचा) वध गणरायाने केला अशी आख्यायिका आहे. 'एकदंत' हा आत्मा आणि परमब्रह्माचे प्रतीक म्हणून ओळखला जातो. हा मूषकवाहन असून अवताराचा उद्देश मदासुराचा (अर्थात मीपणा) वध त्याने केला अशी आख्यायिका सांगितली जाते. 'महोदर' हा वक्रतुण्ड आणि एकदंताचे एकत्र रूप आहे. महोदरला ब्रह्माच्या प्रज्ञेचे प्रतीक मानतात. मोहासुर (अर्थ मोह) याचा वध केला. हा अवतारात गणपती बाप्पाचे वाहन मूषक होते. 'गजवक्त्र किंवा गजनन' हे महोदर अवताराचे अन्यरूप आहे. या अवतारात गणरायाने लोभासुर (लोभ) याचा वध केला. 'लम्बोदर' हे ब्रह्माच्या शक्तीचे प्रतीक असून त्याचे वाहन मूषक आहे. या अवतारात गणपतीने क्रोधासुराचा वध केला. 'विकट' हे सूर्याचे प्रतीक असून या अवतारात गणपतीने कामासुराचा वध केला. विकट अवतारात गणपतीचे वाहन मयूर होते. 'विघ्नराज' हे विष्णूचे प्रतीक आहे. या अवतारात गणरायाने ममासुराचा (अहंकार) वध केला. 'धूम्रवर्ण' हा गणपतीचा अवतार म्हणजे शिवाचे प्रतीक आहे. धूम्रवर्ण अवतारात गणरायाचे वाहन घोडा होते. या अवतारात गणपतीने अभिमानासुराचा नाश केला. गणरायाने प्रत्येक अवतारात दुष्टशक्तींचा विनाश केला. नरान्तक आणि देवान्तक या असूर भावांचा नाश करण्यासाठी पहिल्या महिला सैन्यतुकडीची निर्मिती गणपतीने केली. प्रत्येक अवतारात गणरायाच्या रंजक कथा आपल्याकडे सांगितल्या जातात.

# विघ्नहर्ता


**हिंदू** धर्मात सर्वप्रथम पूजनीय देवता भगवान गणेश आहे. गणपती भोलेनाथ आणि पार्वती देवीचे पुत्र आहे आणि कार्तिकेय हे त्यांचे भाऊ आहे. गणेश त्यांच्या हत्तीचे डोके आणि मानवी शरीराने अतिशय ओळखण्यायोग्य आहे. त्याचे डोके (आत्मा) आणि मानवी शरीर (माया) चे प्रतिनिधित्व करणे. ते लेखक, प्रवासी, विद्यार्थी, वाणिज्य आणि नवीन प्रकल्पांचे संरक्षक आहे भारतात गणेश चतुर्थीच्या रूपात गणपतीची १० दिवस पूजा केली जाते.

**गणपतीची जन्मकथा**

जरी गणपतीच्या जन्माच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत, परंतु सर्वात लोकप्रिय कथा पार्वती आणि शिवाची आहे. एकदा देवी पार्वती आंघोळीला जात असताना त्यांनी आपल्या उबटनातून मानवासारखे बालक निर्माण केले, त्याच्यामध्ये प्राण फुंकले आणि त्याला स्नानागृहाच्या बाहेर उभे केले. आंघोळ करून बाहेर येईपर्यंत कोणालाही आत येऊ देऊ नये, असा आदेश माता पार्वतीने दिला.

बालक मुख्य दरवाजावर पहारा देत असताना भगवान शिव त्यांची तपश्चर्या करून हिमालयात परतले. माता पार्वतीला भेटण्यासाठी मुलाने त्याला आत जाऊ दिले नाही तेव्हा भगवान शिव क्रोधित झाले आणि त्यांनी आपल्या त्रिशूळाने त्याचे डोके तोडले आणि आत प्रवेश केला. जेव्हा माता पार्वती बाहेर आली आणि त्यांनी आपला मुलगा या अवस्थेत पाहिला तेव्हा रडायला सुरुवात केली आणि भगवान शिवाला त्याला पुन्हा जिवंत करण्याची विनंती केली.

पार्वतीजींच्या सांगण्यावरून, भगवान शिव त्यांचे प्राण परत आणण्यास तयार झाले परंतु शीश परत आणणे अशक्य होते. अशात



मुलासाठी नवीन डोके शोधण्यासाठी, शिवाने नंदीला बोलावले आणि त्याला उत्तरेकडे जाण्याचा आदेश दिला आणि म्हटले की म

ुलाकडे पाठ करुन झोपत असलेल्या मातेच्या मुलाचे शीश घेऊन ये. जेव्हा नंदी पृथ्वीवर गेला तेव्हा त्याने सर्वात पहिले हत्तीचे बाळ बघितले आणि त्याचे डोके आणले. भगवान भोलेनाथांनी मुलाला जीवनदान दिले. आपल्या मुलाला पाहून पार्वतीजींना खूप आनंद झाला असला तरी सर्वजण आपल्या मुलाची चेष्टा करतील याची त्यांना भीती वाटत होती. त्यांच्या मुलाला देवांमध्ये स्थान मिळणार नाही. शिवजींना माहित होते की पार्वतीजी नाराज आहेत. म्हणून त्यांनी सर्व देवांना बोलावले आणि आपल्या पुत्र गणेशाला आशीर्वाद देण्यास सांगितले. भगवान शिवाने बाळाचे नाव गणेश किंवा गणपती ठेवले. गणपती म्हणजे प्राणी किंवा गणांच्या सर्व वर्गांमध्ये सर्वोच्च. देवतांनी आशीर्वाद दिला की कोणत्याही विधीची सुरुवात गणपतीच्या पूजेने होईल आणि त्याच्या पूजेशिवाय कोणतेही कार्य पूर्ण होणार नाही.

**गणपती कुटुंब**– पौराणिक कथेनुसार, भगवान गणेशाचा विवाह रिद्धी (समृद्धीची देवी) आणि सिद्धी (ज्ञानाची देवी) या जुळ्या बहिणींशी झाला होता, ज्यांनी आपल्या दोन मुलांना शुभ आणि लाभ यांना जन्म दिला. पण दक्षिण भारतात गणेश ब्रह्मचारी असल्याचे मानले जाते.

**गणपतीचे स्वरूप:** जर आपण पहिल्या पूज्य गणपतीच्या देखाव्याबद्दल बोललो तर त्यांचा चेहरा गजसारखा आहे, हे मोठे डोके मोठ्या विचारांचे प्रतिनिधित्व करते. त्याच वेळी, त्यांचे मोठे कान नेहमी लक्षपूर्वक ऐकण्याचे सूचित करतात. गणपतीच्या चेहऱ्यावरील लहान डोळे तीक्ष्ण दृष्टी आणि एकाग्रता दर्शवतात. भगवान गणेशाला चार हात आहेत, त्यापैकी एका हातात कुऱ्हाडी आहे, जी सर्व बंधनांपासून मुक्तता दर्शवते. दुसऱ्यामध्ये एक दोरी आहे जी तुम्हाला कठीण ध्येये साध्य करण्याचे आणि तुमच्या प्रियजनांना जवळ आणण्याचे प्रतिनिधित्व करते. तर मोदक हे कष्टाचे फळ आहे आणि चौथ्या हाताने ते आपल्या भक्तांना आशीर्वाद देतात.

**अथर्वशीर्ष** – श्री गणेश अथर्वशीर्ष किंवा गणेश अथर्वशीर्षोपनिषद हा गणपतीविषयीचे प्रधान उपनिषद आहे. या ग्रंथात गणपतीस सर्व देवीदेवतांच्या रूपात पाहण्यात आले असून सर्व देवतांपेक्षा श्रेष्ठ मानण्यात आले आहे. या ग्रंथावर तंत्रमताचाही प्रभाव आहे. 'गं' हा गणपतीचा बीजमंत्र आहे असा उल्लेख या ग्रंथात येतो. गणेशाच्या तत्त्वज्ञानात्मक रूपाचे वर्णन हे उपनिषद करते.

**गणेश चतुर्थी** – भाद्रपद महिन्यातील चतुर्थीला म हासिद्धीविनायकी चतुर्थी असे म्हणतात. कर्नाटक व आंध्र प्रदेश राज्यात महाराष्ट्राप्रमाणे भाद्रपद शुक्ल चतुर्थीपासून गणपतीचा उत्सव साजरा करतात. गणेश चतुर्थीची प्रचलित आख्यायिका याप्रकारे आहे की एकदा गणपती चतुर्थीचे स्वतः चे आवडीचे मोदक खाऊन उंदराच्या पाठीवरून जात होता. वाटेत साप पाहिल्याने उंदिर भयाने कापू लागला. यामुळे गणपती उंदराच्या पाठीवरून खाली पडला व त्याचे पोट फाटून मोदक बाहेर पडले. गणपतीने ते सारे मोदक पुनः पोटात टाकले व पोटावर साप बांधला. हे दृश्य पाहून आकाशातील चंद्र हसू लागला. म्हणून तुझे चतुर्थीस कोणी दर्शन करणार नाही असा शाप दिला अशी आख्यायिका प्रचलित आहे.

**गणेश जन्म** – माघ महिन्यातील चतुर्थीला माघी चतुर्थी असे म्हटले जाते. हा गणपतीचा जन्म दिन होय. जागृती, स्वप्न, सुषुप्ती आणि तुरीय अशा चार अवस्था मानल्या गेल्या आहेत. चतुर्थी ही तुरीयावस्था म्हणजे आत्मिक साधनेची एक अवस्था मानली गेली आहे असे भारतीय तत्त्वज्ञान मानते.

**गणपतीची बारा नावे** – गणेशाची अनेक नावे आहेत पण ही १२ नावे महत्त्वाची आहेत – सुमुख, एकदंत, कपिल, गजकर्णक, लंबोदर, विकट, विघ्न-नाश, विनायक, धुम्रकेतू, गणाध्यक्ष, भालचंद्र, गजानन. वरील बारा नावे नारद पुराणात गणेशाच्या बारा नावांमध्ये प्रथमच आली आहेत.

**गणपतीच्या आवडत्या गोष्टी- सिंदूर** – भगवान गणेशाने सिंधू नावाच्या राक्षसाचा वध करून त्याचे रक्त त्याच्या अंगावर लावले होते, तेव्हापासून गणेशाला सिंदूर अर्पण केला जातो.

**दुर्वा** – अनलासुर नावाच्या राक्षसाला गिळल्यानंतर श्री गणेशाच्या पोटात तीव्र जळजळ होऊ लागली. सर्व उपचार करूनही बरा झाला नाही, त्यानंतर कश्यप मुनींनी त्याला दुर्वांच्या २१ गुंट्या बनवून दुर्वा खायला दिल्या, तेव्हापासून भगवान गणेशाने दुर्वा आपली आवडती वस्तू बनवली.

# लोक संस्कृतीच्या जतनासाठी विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करा – राज्यपाल हरिभाऊ बागडे

छत्रपती संभाजीनगर, दि.२० (जिमाका) – लोकसंस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर कला आणि संस्कृतीचे संस्कार करण्यासाठी शाळा ,महाविद्यालये आणि विद्यापीठाच्या म ाध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करा, असे आवाहन राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे यांनी केले.

केंद्रीय संस्कृती मंत्रालयांतर्गत पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूर आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने एमआयटी महाविद्यालयाच्या मंथन सभागृहात आयोजित दोन दिवसीय 'वारसा सह्याद्रीचा' कार्यक्रमाच्या समारोप सम ारंभात सांगितले. राज्यपाल बागडे म्हणाले की, शालेय व महाविद्यालयीन जीवनाम ध्ये आपल्या कलेचा वारसा विद्यार्थ्यांना माहिती होणे आवश्यक आहे.यामुळे लोककलांना प्रोत्साहन मिळेल. तसेच नवीन लोककलाकार तयार होतील. हे व्यासपीठ म्हणजे आपल्या प्राचीन लोककलांना जिवंत ठेवणारे माध्यम ठरू शकते. त्यामुळे याकडे लक्ष देण्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

लोककलांमधून संस्कृती दर्शनही घडते.परस्पर संस्कृतीचा परस्पर कलांची माहिती होते.त्यातून एकतेची संस्कृती तयार होते.भारताचे वैविध्य व त्यातून एकता हे वैशिष्ट्य आहे. ते म्हणाले ,भारताला कोणीही गुलाम बनवू शकत नाही, कारण येथे एकतेची संस्कृती आहे. ही संस्कृती अखंड राहिली तर कोणीही भारताकडे वाईट नजरेने पाहू शकणार नाही. शिक्षण घेत असताना काही बदल स्वीकारण्याची गरज व्यक्त करत भारतीय गुरुकुल शिक्षण पद्धती मधील काही गोष्टीचा समावेश केल्याने त्याचे फायदे आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल आणि पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूर यांनी अशा महोत्सवांचे आयोजन केल्याबद्दल केंद्राचे संचालक फुरकान खान आणि त्यांच्या टीमचे कौतुक केले.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, म हाराष्ट्र राज्य, मुंबईचे सहसंचालक श्रीराम पांडे, पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्राचे संचालक फुरकान खान, एमआयटीचे संचालक मुनिश शर्मा यांच्यासह विद्यार्थी, नागरिक या कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत आणि महाराष्ट्राच्या राज्यगीताने झाली. मोहिता दीक्षित आणि मिलिंद रमेश कुलकर्णी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. 'वारसा सह्याद्रीचा' मध्ये ७ राज्यांच्या लोकनृत्यावर थिरकले संभाजीनगरकर ७ राज्यातील २३५ कलाकारांचा सहभाग, सात राज्यांच्या लोककला आणि संस्कृतीचा अनोखा संगम विविध राज्यांतील वाद्यांची संगीतमय सिम्फनी व लोकनृत्यांवर छत्रपती संभाजीनगरचे रसिक थिरकले. तर विख्यात नृत्यांगणा शमा भाटे यांचे 'कृष्णा द लिबरेटर' हे कथ्थक आणि प्रमिला सूर्यवंशी यांच्या लावणीने प्रेक्षकांच्या मनाला भुरळ घातली. कार्यक्रमात महाराष्ट्रासह गोवा, गुजरात, राजस्थान, मणिपूर, पंजाब आणि पश्चिम बंगाल या ७ राज्यातील २३५ कलाकारांनी लोककला सादर केली. दोन्ही दिवस महोत्सवाला प्रेक्षकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. नृत्यांगना शमा भाटे आणि संचाने 'कृष्णा द लिबरेटर' हे कथ्थक बॅले सादर केले. यात श्रीकृष्णाच्या संकटम ोचनाच्या प्रसंगांना बारकाईने उलगडण्यात आले. भाटे यांच्या दिग्दर्शनाखाली आणि अमीरा पाटणकर व अवनी गद्रे यांच्या नेतृत्वात १४ नृत्यांगनांनी मनमोहक भावमुद्रा आणि आनंदित तालबद्धतेने सादरीकरणाला वेगळ्या उंचीवर नेले. कालियामर्दन, गोवर्धन पर्वत उचलणे, कंस वध, माखन चोरी, गोपी वस्त्रहरण यांसारखे प्रसंग दाखवत गोप-गोपिकांसह सर्वांना संकटातून मुक्त करून निर्भयपणे जगण्याचा संदेश दिला. त्यांनी श्रीकृष्णाचे पर्यावरण प्रेम आणि रूढीवादविरोधी स्वरूपही बारकाईने व्यक्त केले. प्रमिला सूर्यवंशी यांच्या लावणीने महोत्सवात रंग भरले. वेगवान संगीत आणि तालावर थिरकणाऱ्या प्रमिला यांच्या भावमुद्रांनी अस्सल मराठमोळ्या अदाकारीने रसिक मनाला स्पर्श केला. यावर प्रेक्षकांनी अनेकदा हॉल टाळ्यानी दाद दिली.

'डेझर्ट सिम्फनी' या लोकनृत्याच्या सादरीकरणात राजस्थानचे लोकवाद्य खरताल, पुंगी (बीन), चौतारा, कामायचा, सारंगी, मटका, बाजा, ढोलक, मोरचंग यांच्यासह कच्छची वीणा, जोडिया पावा, गमेलू, मंजीरा आणि महाराष्ट्राची नाळ आणि तुतारी यांच्या अनोख्या संगीतमय मिश्रणाने श्रोते थक्क झाले. यानंतर, संतोष नायर यांच्या दिग्दर्शनात तयार करण्यात आलेल्या नृत्य सादरीकरणात गोंधळ, गोव्याचे समई नृत्य, लावणी, राजस्थानचे चरी व कालबेलिया, गुजरातचे राठवा आणि सिद्दी धमाल, मणिपूरचे पुंग ढोल चोलम, पश्चिम बंगालचे पुरुलियाचे नटुआ आणि पंजाबच्या भांगडाच्या सादरीकरणाने प्रेक्षकांची वाहवा मिळवली. सादरीकरणादरम्यान हॉल अनेकदा टाळ्यांच्या कडकडाटाने दणाणून गेला.

विविध राज्यांमध्ये अशा प्रकारचे महोत्सव आयोजित करून एका राज्याची लोकसंस्कृती दुसऱ्या राज्यापर्यंत पोहोचवण्यास मदत होते असे पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूरचे संचालक फुरकान खान म्हणाले. तर छत्रपती संभाजीनगरातील प्रेक्षकांना ७ राज्यातील सांस्कृतिक वैविध्य एकाच व्यासपीठावर अनुभवण्याची संधी देणारा हा अविस्म रणीय असा सांस्कृतिक सोहळा ठरल्याचे पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूरचे सहायक संचालक (वित्त एवं लेखा) दुर्गे श चांदवानी आणि कार्यक्रम अधिकारी हेमंत मेहता म्हणाले.

# शनि अमावस्येनिमित्त हजारो भाविकांनी घेतले भगवान मुनिसुव्रतनाथांचे दर्शन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

श्री.शनिग्रह अरिष्ठ निवारक मुनिस्नुवतनाथ भगवान अतिशय क्षेत्र पैठण येथे मुलनायक भारतातील जैन धर्मियांचे शनि अरिष्ठ निवारक श्रध्दा स्थान मुनिसुव्रतनाथ भगवान येथे शनि अमावस्या निमीत्त महामस्तक अभिषेक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी भगवान मुनिसुव्रतनाथांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी धर्मध्वजारोहन व दिप प्रज्वलन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर व प्रमुख अतिथी तिर्थ क्षेत्र कमिटीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष संजय पापडीवाल अशोक जैन, मनोज चौधरी, अरफ्णा काला यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये इंद्र इंद्राणी बनण्याचे सौभाग्य मितल अमित सुमित निकुंज स्वनिधी ईशिका संगीता जैन परिवार हैद्राबाद यांना मिळाला तर जल अभिषेक सी.ए.जयेश काला मुंबई यांना मिळाला तर नारळ रस श्रेयांस जैन मुंबई, हेमांशु जैन कानपुर, शगुन जैन यांना मिळाला. इक्शुरस पार्थ आनंद पवन टोंग्या परिवार यांना मिळाला. दुग्ध अभिषेकाचा मान रविंद्र जैन मुंबई यांना मिळाला तर शांतीमंत्र मान अशोक जैन दिल्ली यांना मिळाला, पुष्पवृष्टीचा मान मनोज चौधरी हैद्राबाद, सर्व औषधीचा मान राजेश मनिष जैन बाराबंकी, आदींच्या वतीने भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी सुत्रसंचालन क्षेत्राचे महामंत्री विलास पहाडे व कोषाध्यक्ष विजयकुमार पापडीवाल यांनी केले तर बोलीयाचे वाचन संजय पापडीवाल व प्रविण लोहाडे यांनी केले. या प्रसंगी उपस्थित भाविकांना गुरफभक्त सौ.मिनादेवी, बबनलाल, सौ. स्विटी लोकेशकुमार चि.आगम, सर्वार्थ, गोधा परिवार डोणगांववाले पैठन सौ.रिंकु अमित श्रेयांस इशान बडजात्या, सौ.पायल अजय विधान जैन पुणे एवंम समस्त गोधा परिवार डोणगांववाले पैठण छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात आला. महोत्सवासाठी मुंबई, पुणे,नाशिक, औरंगाबाद,जालना,बीड,परभणी, जयपुर, दिल्ली, बैगलोर, हैदराबाद आदि ठिकाणाहुन हजारो भाविक उपस्थित होते.

महोत्सव यशस्वी करण्यासाठी पैठण क्षेत्राचे विश्वस्थ मंडळ, नवयुवक मंडळ, महिला मंडळ, नवयुवती मंडळ, शिक्षक वर्ग यांच्यासह अध्यक्ष महावीर बडजाते,महामंत्री विलास पहाडे,कोषाध्यक्ष विजय पापडीवाल,जयकुमार बाकलीवाल, प्रमोद कासलीवाल, मनोज काला, प्रकाश कासलीवाल, कैलास पाटणी, किशोर भाकरे, सुमीत गंगवाल, डॉ.संजय गगंवाल, डॉ. राजेंद्र काला, स्वदेश पांडे, अभिजीत काला, अशी माहिती महामंत्री विलास पहाडे यांनी दिली

# श्री गोडीजी पार्श्वनाथ जैन मंदिर जोहरीवाडा येथे पाळणाजी व चौदा स्वप्न भगवान महावीर जन्मवाचन उत्सव संपन्न

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

रविवार २४ ऑगस्ट रोजी श्री गोडीजी पार्श्वनाथ जैन मंदिर जोहरीवाडा येथे चौदा स्वप्न व पाळणाजीचे चढावे संपन्न. औरंगाबाद शहरातील अति प्राचिन श्री गोडीजी पार्श्वनाथ जैन मंदिर व श्री मुनीसुव्रततस्वामी जैन श्वेतांबर जैन मंदिर, कर्णपुरा येथे श्री आनंदजी कल्याणजी जैन श्वेतांबर मंदिर ट्रस तर्फे दि.२० ऑगस्ट ते २७ ऑगस्ट २०२५ या दरम्यान पुर्यषण महापर्व आराधनाचे आयोजन करण्यात आले आहे.



**आशिर्वाद प्रदाता** : तपागच्छ प्रवर समिती कार्यवाहक महामांगलीक प्रदाता, प.पु.ग.आ.भ. श्रीमद विजय अभयदेवसुरीश्वरजी महाराजा, प.पु.आचार्य भ. श्री मोक्षरत्नसुरिविश्वजी म.सा., आशिर्वाद प्रदाता: प.पु.ग.आ.भ.श्री हेम प्रभसुरीश्वरजी म.सा. के समुदायवर्ती दीर्घसंयमी कायमी, स्थिरवास प.पु.सा. श्री अर्के दुश्रीजी म.सा., प.पु.तपा.ग.आ.भ.श्री विजयराम सुरीश्वरजी म.सा. (डहलेवाला) के समुदायवर्ती प.पु.ग.आ.भ. श्री विजय अभयदेवसुरीश्वरजी म.सा. के आज्ञानुवर्ती प.पु.सा. श्री अमितप्रज्ञाश्रीजी म.सा. की सुशिष्या प.पु.सा. श्री पुनितप्रज्ञाश्रीजी म.सा. आदिठाणा ३ यांच्या सानिध्यात सकाळी ८.०० वाजता अष्टान्हिका प्रवचन नंतर कार्यक्रमा पुर्वी दुपारी ११.३० वाजता आयंबील, एकासणे व सपुर्ण दीवसाची स्वामीवात्सल्यची व्यवस्था मातोश्री चमेलीबाई प्रेमसुख जी ललवानी परीवार तेजकुमार गिरीशभाई ललवानी परीवारतर्फे जैन भवन जोहरीवाडा येथे करण्यात आली होती.

दुपारी १२.३० वाजता भगवान महावीर जन्म कल्याणक निमित्त माता त्रिशाला ला आलेल्या चौदा स्वप्न भगवतांचा पाळणा, अष्टमंगल, वार्षिक अष्टप्रकारी पुजा सामुग्री, अखंड दिपक आदि विविध चढावे (बोली) संपन्न झाले. पश्चांत गुरूभगवतांच्या मुखारबिंदने भगवतांचे जन्मवाचंन करण्यात आले.

या कार्यक्रमास संगीतकार श्री दर्शितभाई गादिया, जालना स्वमधुर भक्तीगीते सादर केली.

माता त्रिशाला यांना पडलेली चौदा स्वप्ने गजराज, ऋषभ, केसरी सिंग, श्री लक्ष्मीजी, पुष्पकी माला, श्री चंद्रविशाला, सुरज, इंद्रध्वजा, मंगल कलश, पदमसरोवर, क्षीरसागर, देव विमान, रत्नो की राशी, अग्नीशिखा. उपरोक्त कार्यक्रमात श्री. रतीलाल मुगदिया परिवार नम्रता ग्रुप, श्री हसमुख जैन मन मंदिर परिवार, श्री विनोद लोढाया परिवार, श्री विकास रायमाने परिवार, मोमाया परिवार, डॉ. उमेश तातेड परिवार, श्री डॉ. इंद्रकुमार जिदांनी परिवार, चॅम्पीयन परिवार, अशोकभाई सेठ परिवार, राहुल डोसी परिवार, श्री इंद्रचंदजी मुथा परिवार, निलेश बाबरीया परिवार, चंद्रकांतभाई शहा परिवार, मुकेशभाई, जयेशभाई पारिख परिवार, सुरेश जैन परिवार, साखरिया परिवार, फागनिया परिवार, मातोश्री रंजना बहन जैन परिवार, मातोश्री मिना बहन भंडारी परिवार आदि परिवाराने चढावे घेतले. या कार्यक्रमाअंतर्गत मंदिरातुन पाळणा आणण्याचा अमृता धवल मोमाया परिवार ने, भगवतांना पाळणात प्रदारण्याचा मान रतीलाल प्रविणकुमार मुगदीया नम्रता ग्रुप झुलायचा मान माकीबेन मुलचंदजी परमार परिवार. सर्व प्रथम भगवतांचा पाळणा झुलवण्याचा मान परिवाराने घेतला. आणि भगवतांचा पाळणा घरी नेण्याचा राजेश कनकमल सुराणा परिवार मान घेतला.

या प्रसंगी ट्रस्ट्री तर्फे श्री रतीलाल मुगदिया, महेंद्रजी चंडालिया, राहुल डोसी भरत देवडा, जितेंद्र गादिया, राजेश सुराणा, प्रेमचंदजी देवडा आदिंनी उपस्थित सकल जैन बाधंवाचे आभार मानले.

कार्यक्रमा अंतर्गत प.पु.ग. अभयदेव सुरीश्वरजी म.सा.च्या प्रेरणेने अभय मांगलिक मंडख तर्फे सुवर्ण व रजत नाण्यांच्या द्वारे लकी ड्रॉ काढण्यात आला.

# देवगिरी महाविद्यालयात वाणिज्य विभागाअंतर्गत 'स्पर्धा परीक्षा व रोजगारांच्या संधी' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**




मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित देवगिरी महाविद्यालयात दि. २१/०८/२०२५ रोजी, वाणिज्य विभागाअंतर्गत 'स्पर्धा परीक्षा व रोजगारांच्या संधी' या विषयावर चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते हे होते तर प्रमुख पाहुणे व वक्ते श्री. अक्षय चोळके, श्री. सिद्धेश्वर कोंघे, संचालक सारथी एज्युकेशन,व श्री संजीत कदम व्यवस्थापक सारथी एज्युकेशन हे होते. सुरुवातीला वाणिज्य विभागाचे विभागप्रमुख डॉ. आर. बी. लहाने यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

प्रास्ताविकात वाणिज्य विभागाअंतर्गत दरवर्षी होणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांविषयी सांगत विद्यार्थ्यांनी त्यात कशा पद्धतीने सहभागी व्हावे या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

प्रमुख वक्ते श्री. अक्षय चोळके यांनी बँकिंग परीक्षांची करावयाची तयारी याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी बँकिंग व इतर स्पर्धा परीक्षांमध्ये कोणते विषय असतात व त्या विषयांची तयारी महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच आपण कशा पद्धतीने करायला पाहिजे याविषयी खूप प्रेरणादायी असे मार्गदर्शन केले. तसेच श्री. सिद्धेश्वर कोंघे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची व बँकिंगच्या परीक्षांची करावयाची तयारी याविषयी मार्गदर्शन करत आपण बँकिंग हे क्षेत्र का निवडावे व आज बँकिंग या क्षेत्राची आवश्यकता व त्यात उपलब्ध संधी त्यामुळे दरवर्षी होणारी भरती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच जनरल अवेअरनेस हा विषय आपण कशा पद्धतीने तयार करू शकतो हे सांगितले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते यांनी सध्याच्या परिस्थितीची जाणीव करून देत बँकिंग क्षेत्राची आवश्यकता व त्यात उपलब्ध संधी याविषयी सांगितले. बँकिंग क्षेत्रात नोकरी करणाऱ्यांना आज असलेला सामाजिक दर्जा व सुविधा याविषयी विद्यार्थ्यांना सांगत त्यांनी बँकिंग क्षेत्र का निवडावे हे सांगितले. सदरील कार्यक्रमासाठी २३० विद्यार्थी उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.प्रणिता चिटणीस यांनी केले तर आभार प्रदर्शन गायत्री खटाटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# नर्सिंग भरतीतील लिंगविभाजक नियमाविरोधातील उपोषणाला युवासेनेची भेट



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

नर्सिंग भरतीत लागू करण्यात आलेल्या ८०:२० (पुरुष-महिला) लिंगविभाजक नियमाविरोधात युवकांनी आंदोलन छेडले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काही तरुण उपोषणाला बसले असून शासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

आंदोलकांची मागणी आहे की, भरती प्रक्रिया शैक्षणिक गुणवत्ता व पात्रतेवर आधारित, लिंगनिरपेक्ष व पारदर्शक असावी. पुरुष नर्सेसना न्याय मिळावा यासाठी स्वतंत्र धोरण आखावे, तसेच ८०:२० नियम तात्काळ रद्द करावा. शासनाने या अधिसूचनेमागील कारण स्पष्ट करावे, अशीही मागणी आहे. या निर्णयामुळे अनेक युवकांना रोजगाराच्या संधीपासून वंचित रहावे लागत असून भरती प्रक्रियेत अन्याय होत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास राज्यभर तीव्र आंदोलन पेटेल, असा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन युवासेनेने चर्चा केली आणि उपोषण सुरू असेपर्यंत तुमच्या सोबत असू असे, आश्वासन दिले. यावेळी कॉलेजकक्ष प्रमुख निखिल काकडे, बच्चू भांगे समन्वयक, विभाग प्रमुख कृष्णा सोनवणे, अभी पाटील, यशराज फुलारे, नासिर पठाण, अमर मुलतानी, प्रतीक ढकले, धनराज आगळे, आयान पठाण उपस्थित होती.

# पब्लिक सेवा फाउंडेशनच्या वतीने रविवारी सभागृहात भव्य रक्तदान शिबिर संपन्न



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

शहरातील रक्ताच्या तुटवड्याची गरज ओळखून पब्लिक सेवा फाउंडेशन च्या वतीने रविवारी सकाळी १० वाजता जामा मस्जिद समोरील सामाजिक सभागृहात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात रक्तसंकलनाचे कार्य शासकीय घाटी रक्तपेढी तर्फे पार पडले. गोरगरीब व गरजू रुग्णांना रक्तपुरवठा होण्यासाठी या उपक्रमाचा मोठा फायदा होणार असून, नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वाळूज महानगर परिसरातील अनेक नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. त्यामुळे शिबिराचे वातावरण उत्साहपूर्ण आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवणारे ठरले. या प्रसंगी पब्लिक सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष आदिल सिद्दीकी, उपाध्यक्ष शेख समीर, सचिव शेख मोबीन आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी सर्व रक्तदात्यांचे मनःपूर्वक आभार मानले. समाजहितासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात आले.

# संयम, संपर्क, समन्वयाने गणेशोत्सव साजरा करावा - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

गणेश उत्सव साजरा करतांना कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेऊन पोलीस प्रशासन व गणेश मंडळ, नागरिकांत संपर्क, संयम आणि समन्वयाने उत्साहात गणेश उत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात गणेश उत्सावाच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीस अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, ग्रामीण पोलीस उपअधीक्षक अन्नपूर्णा सिंह, सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार उपस्थित होते. आगामी सण, उत्सवाच्या अनुषंगाने गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी सार्वजनिक सुरक्षेची काळजी, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य सुविधा तसेच पान ४ वर

# जय बाबा बर्फानी मित्र मंडळातर्फे अमरनाथ यात्रा संपन्न व स्वातंत्र्य दिनानिमित्त महाप्रसाद सोहळा उत्साहात पार पडला



**छत्रपती संभाजीनगर :** जय बाबा बर्फानी मित्र मंडळ, राजाबाजार अलोकनगर बीड बायपास तर्फे अमरनाथ दर्शन यात्रा संपन्न झाल्याचा आनंद व स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून रविवारी २४ सप्टेंबर रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

हा सोहळा बाबा बर्फानी महादेव मंदिर, म्हस्के पेट्रोल पंपासमोर, अलोकनगर, रामविजय हौसिंग सोसायटी, संभाजीनगर येथे पार पडला. दुपारी ४ वाजता सुरू झालेला कार्यक्रम रात्री ८ वाजेपर्यंत भक्तिमय वातावरणात चालला. या प्रसंगी मोठ्या प्रम ाणात भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला. भक्तांच्या गर्दीमुळे मंदिर परिसरात श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. जय बाबा बर्फानी मित्र मंडळ तर्फे प्रत्येक भाविकांचे स्वागत करण्यात आले. महाप्रसादाच्या आयोजनाबरोबरच धार्मिक गीतांनी व भक्तिगीतांनी उपस्थित भाविकांना अध्यात्मिक अनुभव मिळाला.

या यशस्वी आयोजनामुळे मंडळाच्या कार्यकर्त्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. भक्तांच्या सेवेतून सामाजिक व धार्मिक कार्याला चालना मिळावी या उद्देशाने कार्यक्रम पार पडल्याचे आयोजकांनी सांगितले. आलोक नगर मध्ये शिव शंकराचे सुंदर मंदिर देखील बांधण्यात आले आहे त्यात विठ्ठल रखुमाई श्रीराम, हनुमंत राय, गणपती बाप्पा यांचेही मंदिर आहे. येथे दर्शनासाठी भाविकांची नेहमीच गर्दी असते. अमरनाथ बाबांचे दर्शनासाठी प्रत्येक वर्षी भाविक जास्त असतात असे रोशन जी पिपाडा बाबा बर्फानी मित्र मंडळ संस्थापक अध्यक्ष यांनी सांगितले.

### बाबा बर्फानी माझ्याकडून सेवा करवून घेतात- रोशन पिपाडा

“छत्रपती संभाजीनगर येथील रोशन पिपाडा हे संस्थापक अध्यक्ष बाबा बर्फाणी मित्र मंडळ हे गेली १५ वर्ष ज्या भाविक भक्तांना अमरनाथ या ठिकाणी जाणे शक्य होत नाही आणि बाबा बर्फानी यांचे दर्शन घेणे शक्य होत नाही अशा भावी भक्तांसाठी दरवर्षी बाबा बर्फानीचे शिवलिंग छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी तयार करून त्याची गेली पंधरा वर्षांपासून भव्य दिव्य अशी मिरवणूक काढतात बम बम भोले च्या जय घोषाने शोभायात्रा काढली जाते आणि छत्रपती संभाजी नगर शहरवाशी यांना त्यांचे दर्शन घडवतात बाबा बर्फानी यांच्या यात्रेचे नियोजन ढोल ताशाच्या गाजरात ढमरूपथकाच्या निनादाने दरवर्षी प्रमाणे केले जाते त्याचबरोबर अन्नदान सुद्धा केले जाते. दिवसभर भंडाऱ्याचा कार्यक्रम विविध उपक्रमांनी सजवून भव्य दिव्य अशा बाबा बर्फानी यांची मिरवणूक काढत संपूर्ण शहरवासी यांचे डोळे अगदी तृप्त होऊन जातात बाबा बर्फानी यांचे आशीर्वाद कायमच शहरवासी यांच्यासोबत आहेत आणि राहणारे आहेत. असे बाबा बर्फानी मित्र मंडळ, राजाबाजार, अलोकनगरचे संस्थापक अध्यक्ष रोशनजी पिपाडा यांनी ‘अट्टल मत’शी बोलताना सांगितले.

# देवगिरी सहकारी साखर कारखान्याचे प्रशासकीय मुख्य संचालक श्री.कल्याणदादा चव्हाण यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



**देवगिरी सहकारी साखर कारखाना तब्बल १३ वर्ष बंद होता, दादांच्या माध्यम ातून कारखान्यात रेपेरिंगचे काम सुरु झाले आहे. लवकरच हा कारखाना पूर्वीप्रम ाणे प्रगतीपथावर येवो आणि कारखान्याच्या माध्यमातून शेतकरी बांधवांच्या घरात आर्थिक सुबत्ता आणि समृद्धी नांदो हीच रेणुका मातेच्या चरणी प्रार्थना.**

पान ४ वर

## संयम, संपर्क, समन्वयाने गणेशोत्सव साजरा करावा - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

विसर्जनासाठी करण्यात आलेल्या विशेष नियोजनाबाबत संबंधित विभागांना सूचना जिल्हाधिकारी श्री. स्वामी यांनी दिल्या. गणेश मूर्तींच्या आगमनावेळी तसेच विसर्जनावेळी कायदा व सुव्यवस्था अबधित राखण्यासाठी पोलीस विभागाकडून पुरेशा संख्येने बंदोबस्त ठेवण्यात यावा. विसर्जन मिरवणूकी वेळी वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी महत्त्वाच्या मार्गांवर वाहतूक नियमन करण्याचे विसर्जनासाठी नद्या, तलाव तसेच कृत्रिम तलावांवर पुरेशा सुरक्षेच्या उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच उत्सावाचा काळात कोणाच्याही धार्मिक भावना दुखावणार याची विशेष काळजी घेण्यात यावी. स्वच्छता मोहिम राबवून पाण्याचे प्रदूषण टाळण्यासाठी जनजागृती करावी. पर्यावरणपूरक मूर्ती व नैसर्गिक साहित्याचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. आरोग्य विभागाने आपत्कालीन वैद्यकीय सुविधा व रुग्णवाहिका उपलब्ध ठेवाव्यात. उत्सवाचा काळात जिल्ह्यातील संपूर्ण सार्वजनिक गणेश मंडळाची संपर्क यादी अद्यावत करुन पोलीस प्रशासनाने मंडळाच्या संपर्कात राहावे तसेच अन्न व औषध प्रशासन यांच्याकडून विशेष तपासणी मोहिम राबविण्यात यावी, यात मिठाई, मोदक, नैवद्य, भेसळयुक्त पदार्थ तसेच दुकानावर विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देशही यावेळी जिल्हाधिकारी श्री. स्वामी यांनी दिले.

# श्री गणेश महासंघाचा यंदा ‘नशामुक्त’ गणेशोत्सव

## पत्रकार परिषदेत उत्सव समिती अध्यक्ष अनिकेत नीलावार यांची माहिती

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जिल्हा श्री गणेश महासंघ उत्सव समितीच्या वतीने यंदाचा श्री गणेशोत्सव विविध समाजाभिमुख उपक्रमांनी साजरा करण्यात येणार असून ‘नशामुक्त’ छत्रपती संभाजीनगर हा संकल्प घेऊन सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रम संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज भाऊ पवार यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात येणार असल्याची माहिती श्री गणेश महासंघ उत्सव समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष अनिकेत निल्लावार यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेस कार्याध्यक्ष नंदकुमार घोडेले, राजू शिंदे, अनिल बोरसे, डॉ.बाळासाहेब थोरात, राजेंद्र दाते पाटील, डी. एन. पाटील, महेश उबाळे, रामभाऊ पेरकर, गणू पांडे, गोकुळ मलके, हरीश शिंदे, शिवाजी कवडे, विक्की जाधव, प्रसिद्धी प्रमुख सचिन लिला सुखदेव अंभोरे, यांची उपस्थिती होती.

पत्रकार परिषदेत अधिक माहिती देतांना अनिकेत निल्लावार म्हणाले कि, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत श्री गणेश महासंघाच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उदघाटन मोठ्या थाटात आणि जल्लोषात करण्यात आले. स्वाभिमान संस्कृतीचा....अभिमान उत्सवाचा... हे ब्रीद घेऊन श्री गणेश महासंघ यंदा १०१ वे वर्ष साजरे करत आहे. यामध्ये गणेश भक्तांच्या सहभागाने श्री गणेशोत्सवाची सुरुवात विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांनी होणार आहे. यावेळी अध्यक्ष अनिकेत निल्लावार यांनी महासंघाची नूतन कार्यकारिणीही घोषित केली.

असे आहेत कार्यक्रम :

बुधवार, दिनांक २७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता शहरातील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत अजबनगर येथील श्री गणेश महासंघाच्या मध्यवर्ती कार्यालयात ङ्गश्रीङ्घ ची प्रतिष्ठापना होईल. तर दुपारी १२ ते ७ वाजेदरम्यान पर्यावरणाच्या संवर्धनार्थ जिल्हा परिषदेच्या मैदानावर ङ्गएक झाड, एक मंडळ अभियानास



सुरुवात होईल. गुरुवार, दिनांक २८ ऑगस्ट रोजी समर्थ नगर येथील वरद गणेश मंदिरात सकाळी ७ ते ८ वाजेदरम्यान श्री गणेश भक्तांच्या सहभागाने ङ्गअथर्वशीर्ष महापठणङ्घ होईल. शुक्रवार, दिनांक २९ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता अनाथ मुले तसेच वृद्धाश्रमातील वयोवृद्ध नागरिकांना विशेष मेजवानी देण्यात येईल. शनिवार, दिनांक ३० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजेपासून प्रोझोन मॉल च्या प्रांगणात पारंपारिक व संस्कृती जोपासणारी भव्य

ढोल-ताशा वादन स्पर्धा होईल. रविवार, दिनांक ३१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता

श्री गणेश महासंघ उत्सव समितीच्या मध्यवर्ती कार्यालयात महानगर पालिकेतील स्वच्छता कर्मचारी वर्गासाठी विशेष आरोग्य चिकित्सा शिबीर होईल. सोमवार, दिनांक १ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेपासून क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य स्मारकास अभिवादन करून ङ्गमहापुरुषांच्या स्मारकांच्या स्वच्छता मोहीमङ्घ राबविण्यात येईल. मंगळवार, दिनांक २ सप्टेंबर रोजी शहरातील विविध शाळांमध्ये नशामुक्त छत्रपती संभाजी नगर या मोहिमेस प्रत्यक्षरित्या प्रारंभ होईल. बुधवार, दिनांक ३ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजेपासून जिल्हा परिषदेच्या मैदानावर अस्सल मराठी मातीतील मैदानी खेळ ‘कुस्ती स्पर्धा’ सुरु होतील. तर गुरुवार, दिनांक ४ सप्टेंबर रोजी अजबनगर येथील श्री गणेश महासंघाच्या कार्यालयात सकाळी १० वाजेपासून भव्य रक्तदान शिबिरास रक्तदात्यांच्या सहभागाने सुरुवात होईल. तर शनिवार, दिनांक ६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता राजाबाजार येथील शहराचे ग्रामदैवत श्री संस्थान गणपती मंदिरापासून श्री गणेश विसर्जन मि रवणुकीस शहरातील लोकप्रतिनिधी तसेच गणेशभक्तांच्या सहभागाने प्रारंभ होईल.

श्री गणेश महासंघ उत्सव समितीच्या वतीने आयोजित विविध समाजाभिमुख उपक्रम तसेच कार्यक्रमास शहरातील सर्व गणेश भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज भाऊ पवार, उत्सव समिती अध्यक्ष अनिकेत निल्लावार, कार्याध्यक्ष डॉ. राजेंद्र दाते पाटील, अभिजीत देशमुख, किशोर शितोळे, तनसुख झांबड, शिरीष बोराळकर, विजय औताडे, राजीव जहागीरदार,अनिल मकरिये, पंकज फुलफगर,डी.एन.पाटील, राजु शिंदे, राजेंद्र दानवे, नंदकुमार घोडेले, कृष्णा बनकर, नागराज गायकवाड, अनिकेत पवार सचिन पवार, हरीश शिंदे, हर्षवर्धन कराड, विश्वनाथ राजपूत, राज वानखेडे, विशाल दाभाडे, अनिल बोरसे, संजय (सन्नी) बारवाल, शिवाजी दांडगे, सुमित खांबेकर, बाळासाहेब औताडे, राम पेरकर,आनंद तांदुळवाडीकर, सतिश कटकटे, प्रशांत जोशी, विक्की जाधव, बबन नरवडे, राजेश मेहता, अ‍ॅड. निनाद खोचे, स्वरूप जाधव, अशोक शहा, रुपेश शिंदे, प्रसिद्धी प्रमुख सचिन लिला सुखदेव अंभोरे यांनी केले आहे.




**श्री गणेश महासंघ उत्सव समिती २०२५-२६ मध्यवर्ती कार्यालयाच्या उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते करण्यात आले होते. याप्रसंगी श्री गणेश महासंघ उत्सव समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष अनिकेत निल्लावार यांनी त्यांचे स्वागत केले.**

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199